# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

## **साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला**



लोकमत पुणे, शनिवार, दि. २९ डिसेंबर २०१८

# वैचारिक प्रबोधन : साहेबराव बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला

महाराष्ट्राला प्रबोधनाची उज्ज्वल परंपरा हे मध्ययुगीन कालखंडातील प्रबोधनाचे स्वरूप अध्यात्मिक होते. तर आधुनिक काळात ते सामाजिक झाले. एकोणिसाव्या शतकात ब्रिटिशांच्या आगमनाबरोबर आलेल्या इंग्रजी शिक्षणाने नवशिक्षितांना आधुनिक ज्ञान-विज्ञानाची ओळख झाली. शिक्षकांमध्ये सामाजिक, धार्मिक अंगाने चिकित्सा वाढीस लागली. परिणामी पारंपरिक व आधुनिक विचारांची घुसळण होऊन समाजजीवनात वैचारिक संक्रमण सुरू झाले. या संक्रमण अवस्थेत संभ्रमीत झालेल्या समाजाला मार्गदर्शनाच्या गरजेतून व्याख्यानमाला हे विद्यापीठ स्थापन झाले. न्यायमूर्ती रानडे यांनी २१ जानेवारी १८७१ रोजी स्थापन केलेल्या वक्तृत्वोत्तेजक सभा या संस्थेला व्याख्यानमाला विद्यापीठाचा पाया म्हटले जाते. यातून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात अनेक संस्थांनी व्याख्यानमाला संस्कृती रुजवली. वक्ता आणि श्रोता यांचा हृद्य संवाद घडविणे, भूतकाळाचे विश्लेषण करताना वर्तमानकाळ समजून घेणे आणि भविष्याचा वेध घेताना त्याचे नेमके सूचन करण्याचे काम व्याख्यानांनी केले. त्यातूनच स्वा. सावरकर, आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे, राम शेवाळकर, बाबासाहेब पुरंदरे अशा अनेक वक्त्यांची महाराष्ट्राला उज्ज्वल परंपरा लाभली. यांच्या विचारातून संवेदनशील श्रोते घडले. आणि त्यांच्यामध्ये ज्ञानाची जिज्ञासा निर्माण झाली. पण या व्याख्यानमाला प्रामुख्याने पुणे, मुंबई, नाशिक यासारख्या शहरी भागातच आयोजित केल्या जातात. ग्रामीण भागात असा विचारांचा सोहळा अभावानेच आढळतो.

या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना समाजात यशस्वी झालेल्या एका अतिमहत्त्वाच्या प्रत्यक्षानुभवाचा आनंद मिळावा यासाठी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या वतीने साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन दि. २६ जानेवारी ते फेब्रुवारी दरम्यान केले जाते. व्याख्यानमालेचे हे अठरावे वर्ष आहे. या व्याख्यानमालेने उत्तर पुणे जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनात स्वतंत्र असे स्थान निर्माण केले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना, नागरिकांना या सात दिवसांत दर्जेदार व्याख्याने ऐकण्याची मेजवानी सातत्याने उपलब्ध करून दिली आहे. उत्तम आयोजनाचा नमुना असणारी ही व्याख्यानमाला सकाळी बरोबर दहा वाजता सुरू होते. व्यासपीठावर फक्त वक्ता आणि समोर सात ते आठ हजार विद्यार्थी हे या व्याख्यानमालेचे ठळक वैशिष्ट्य. गेल्या सतरा वर्षांत डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. जयंत नारळीकर, डॉ. विजय भटकर, ॲड. उज्ज्वल निकम, पंडित हृदयनाथ मंगेशकर, विक्रम गोखले, सुधीर गाडगीळ, उदय निरगुडकर, राजीव खांडेकर, हनुमंत गायकवाड, यांच्यासारख्या अत्यंतिक प्रतिष्ठित आणि सर्वांना आदरस्थानी असणाऱ्या अनेक वक्त्यांनी या व्याख्यानमालेची उंची आणि लौकिकात वाढ केली आहे. महाविद्यालयीन जीवनात

**- राजेंद्र मांजरे**

समाजाच्या विविध क्षेत्रांत मोठी झालेली माणसे अगदी जवळून अनुभवायला मिळणे हे तसे भाग्यच. ग्रेट माणसं म्हणजे नेमकी कोणती? त्यांची विचारसरणी कशी असते? त्यांच्यावर प्रभाव कोणाचा असतो? त्यांची ध्येयं कोणती असतात? ही माणसं कशी घडतात हे विद्यार्थ्यांना जडणघडणीच्या वयात अनुभवायला मिळणं त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने खूप आवश्यक असते. विद्यार्थीही लक्षपूर्वक व्याख्याने ऐकतात. महत्त्वाच्या टिपणी काढतात. त्यावर चर्चा करतात. वक्त्यांशी संवाद साधून प्रश्न विचारतात. त्यातून विद्यार्थ्यांनाही वेगळं, नव वेगळ्या वाटेने काही करण्याची प्रेरणा मिळत असते. महाविद्यालयात या व्याख्यानावर आधारित मला आवडलेला वक्ता या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन केले जाते. त्यातील प्रथम तीन क्रमांकाचे निबंध महाविद्यालयाच्या ज्ञानदीप वार्षिक अंकात छापले जातात व त्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात गौरवण्यात येते. त्यामुळे विद्यार्थीही काळजीपूर्वक महत्त्वाची टिपणं काढतात. मुख्य म्हणजे विद्यार्थी मनापासून या व्याख्यानमालेचा आनंद घेतात त्यामुळे चांगले कानसेन तयार होण्यात मदत झाली आहे.

व्याख्यानमालेमुळे विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या क्षेत्रांची माहिती होते. त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण होते. त्यांच्यामधून साहित्यिक गुण वाढीस लागतात आणि त्यांनी आपण वेगळे काही करावे अशी स्वप्ने पडू लागतात.

गेल्या काही वर्षांचा विचार केला तर महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात स्पर्धा परीक्षांना बसू लागले आहेत. कविता, कथा अशा साहित्य प्रकारांतून व्यक्त होऊ लागले आहेत. त्यांचे ग्रंथालयाकडे पाय वळत आहेत. त्यांच्यामध्ये वाचनसंस्कृती वाढीस लागली आहे. विद्यार्थी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतिक विभाग व विद्यार्थी कल्याण मंडळाने राबवलेल्या वेगवेगळ्या उपक्रमांत मोठ्या संख्येने सहभागी होताना दिसू लागला आहे. दूरचित्रवाणी वाहिन्यांच्या दिवस-रात्र रतीबाने जाण्याला वेग आला असताना, या व्याख्यानाचे भवितव्य तरी काय? अशा प्रश्नाची समाजात चर्चा होते परंतु साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेला श्रोत्यांच्या मिळणाऱ्या भरभरून प्रतिसादामुळे व्याख्यानमाला भरात असल्याचे दिसणारे चित्र मनाला आश्वासक दिलासा देणारे आहे. महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थी उत्सुकतेने या व्याख्यानमालेची वाट पाहतो आहे. ही गोष्ट आयोजक म्हणून खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील व त्यांच्या सर्वच सहकाऱ्यांना सुखावणारी आहे. विचारांचा 'शब्दोत्सव' समाजात त्याच निष्ठेने चालवण्याची खरी गरज आहे. साहेबराव बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमाला आयोजकांनी उत्तरोत्तर पुढे नेली पाहिजे, अशी भावना ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी व्यक्त करतात.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख